# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

सुर्यकांत वगळ प्रसुतिगृह, झावबावाडी

क्र.एचओ/ 681 /एसव्हीएमएच दि.09.01.2026

**<u>स्वारस्य अभिव्यक्ति जाहिरात</u>**

**विषय :** **सी विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत सुर्यकांत वगळ प्रसुतिगृह, झावबावाडी येथे डॉक्टरांचे पॅनेल स्थापन करण्याबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत सुर्यकांत वगळ प्रसुतिगृह, झावबावाडी येथे बधिरीकरणतज्ञ आणि बालरोगतज्ञ यांचे पॅनेल स्थापन करण्यास मंजुरी प्राप्त झाली आहे. यास्तव बधिरीकरणतज्ञ याकरिता 02 आणि बालरोगतज्ञ याकरिता 01 डॉक्टरांची आवश्यकता असून पात्रता कर्मचा-यांनी बधिरीकरणतज्ञ आणि बालरोगतज्ञ पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणीक अर्हतेची पूर्तता करून अर्ज आणि कागदपत्रे दि.12.01.2026 ते दि.20.01.2026 पर्यंत वेळ स.10:00 ते दु.3:00 वाजेपर्यंत सादर करावीत.

- **<u>बधिरीकरणतज्ञ आणि बालरोगतज्ञ पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणीक अर्हता</u>**

  1. उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका/डीएनबी धारण करणारा असावा.
  2. पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर 1 वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.
  3. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच नुतणीकर केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
  4. अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र/नुतनीकरण आवश्यक.

- **<u>बधिरीकरणतज्ञ आणि बालरोगतज्ञ पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती</u>**

  1. बधरीकरणतज्ञ/बालरोगतज्ञ पॅनेलवरील डॉक्टरांची वयोमर्यादा 65 वर्षापर्यंत राहिल.
  2. बधिरीकरणतज्ञ/बालरोगतज्ञ पॅनेलवरील तज्ञांना चक्रांकीत पध्दतीने शस्त्रक्रियेकरिता बोलविण्यात येईल.
  3. बधिरीकरणतज्ञांना नियमित शस्त्रक्रियेबरोबर तातडीच्या शस्त्रक्रियेकरता सुध्दा उपलब्ध राहावे लागेल.
  4. बालरोगतज्ञांना नवजात बालकाची प्रकृती स्थिर होईपर्यंत प्रसुतीगृहात थांबणे आवश्यक असेल.
  5. बालरोगतज्ञांना नियमित प्रसुती तसेच तातडीच्या प्रसुतीस(नवजात बालकांच्या तातडीच्या परिस्थितीत) उपलब्ध राहावे लागेल
  6. बधिरीकरणतज्ञ/बालरोगतज्ञ पॅनेलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसुतीगृहापासून शक्यतो जवळ असावे.

- **कार्यालयाचा पत्ताः**

  वैद्यकीय अधिकारी,<br>सुर्यकांत वगळ प्रसुतिगृह, झावबावाडी,<br>ठाकूरद्वार, मुंबई – 400002.

**सही/-**

**वैद्यकिय अधिकारी**

**सुर्यकांत वगळ प्रसुतिगृह, झावबावाडी**